# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ **Email : directornss@sgbau.ac.in**


क्र.संगाबाअवि/१३/५४/२०१७
दिनांक : १८.०८.२०१७

प्रति,
प्राचार्य/विभागप्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना आवेदनपत्र पाठविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे प्रावधानानूसार विद्यापीठाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध असून विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे.

महाविद्यालय हे विद्यापीठ परिक्षेत्रामधील दुर्गम, अतिदुर्गम, ग्रामिण, तालुका किंवा जिल्हा स्तरावर असेल पण या महाविद्यालयांना कोणत्याही प्रकारची शासकिय मदत मिळत नसेल अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता शुध्द पेयजल मिळावे ह्या उद्देशाने **"संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना"** कार्यान्वयीत केल्यास त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल, याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७.१०.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्र.१५६ अन्वये या योजनेकरीता सोबत जोडलेल्या नियमावलीस मान्यता प्रदान केल्यानुसार नियम तयार केलेले आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, सत्र २०१७-२०१८ मध्ये **"संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना"** या योजनेंतर्गत आपले महाविद्यालय सोबत जोडलेल्या नियमावलीनुसार पात्र असल्यास सोबतचे आवेदन पत्र प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कार्यालयास दिनांक ३१ ऑगष्ट, २०१७ पर्यंत किंवा पूर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावी.

सोबतचे आवेदनपत्र महाविद्यालयामार्फत, प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी, आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित नसल्यास अथवा अपूर्ण माहिती सादर केल्यास तसेच विहित मुदतीत आवेदन पत्र प्राप्त न झाल्यास आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाही याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी. सदर माहिती ही विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर **Students Development** या शिर्षातील **Letter** या उपशिर्षामध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्रः नियमावली व आवेदन पत्र**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
## संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना नियमावली

**१)योजनेचे नांव -**

या नियमांना "संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना" या नावाने संबोधले जाईल.

**२)योजनेची अंमलबजावणी -**

सदर नियम शैक्षणिक सत्र २०१७-२०१८ पासून अमलात येतील.

**३)व्याख्या -**

या नियमात उपयोगात आणल्या जाणाऱ्या व्याख्या खालीलप्रमाणे असतील.

**अ)महाविद्यालय :**

महाविद्यालय म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय.

**ब)विद्यार्थी: :**

विद्यार्थी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमित रित्या पदवी पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेला विद्यार्थी / विद्यार्थीनी.

**४) योजनेची उद्दिष्टे -**

अ) विद्यापीठ परिक्षेत्रातील अतिदुर्गम, दुर्गम, आदीवासी बहुल, ग्रामिण, तालुकास्तरीय किंवा जिल्हास्तरीय विना अनुदानीत/अनुदानीत महाविद्यालयांना शुध्द पेयजल मिळावे.

ब) विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शुध्द पेयजल योजना राबविणे.

**५) पात्रता -**

अ) सदर योजनेचा लाभ हा क्रमवारी नुसार जसे अतिदुर्गम, दुर्गम, आदीवासी बहुल, मागास, ग्रामिण, तालुका व जिल्हास्तरीय महाविद्यालयांना घेता येईल.

ब) सदर योजनेचा लाभ हा ज्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग हयांच्या UGC Act १९५६ मधिल १२ बी नुसार कोणतीही केंद्रसरकारची अनुदान मिळत नसेल अशा महाविद्यालयांना घेता येईल.

क) सदर योजनेचा लाभ हा बिगर व्यावसायिक महाविद्यालयांना घेता येईल.

**६) योजनेची कार्यप्रणाली -**

अ) संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना ही बिगर व्यावसायीक व तसेच ज्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग हयांच्या UGC Act १९५६ मधिल १२ बी नुसार कोणतीही केंद्रसरकारची अनुदान मिळत नसेल अशा महाविद्यालयांना लागु राहील.

ब) प्रत्येक वर्षी साधारणत: पाच महाविद्यालये अतिदुर्गम, दुर्गम, आदिवासी-बहुल, ग्रामीण व शहरी या पसंतीक्रमानुसार योजनेस पात्र असतील.

क) एकदा महाविद्यालय लाभांकित झाल्यानंतर त्या महाविद्यालयास पुढील १० वर्षे लाभ घेता येणार नाही.

ड) महाविद्यालयांचा मागील LEC चा अनुपालन अहवाल हा समाधानकारक असला पाहिजे.

इ) ज्या महाविद्यालयामध्ये सदर योजना कार्यान्वयीत केली असेल अशा महाविद्यालयांना पुढील LEC सोबत योजना सुस्थितीत असल्याचा अहवाल देणे बंधनकारक असेल.

फ) पात्र महाविद्यालयाच्या निकषामध्ये बदल करण्याचा अधिकार हा मा.कुलगुरूंना राहील.

**७) महाविद्यालयांची निवड -**

**अ)** ज्या महाविद्यालयांना सदर योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्या महाविद्यालयांनी परिच्छेद ६) मधील निकषांचे तंतोतंत पालन करत असेल अशा महाविद्यालयांनी सदर योजनेकरीता अर्ज संचालक, विद्यार्थी विकास ह्यांचेकडे ३१ ऑगष्ट पर्यंत सादर करावेत.

**ब)** संचालक, विद्यार्थी विकास ह्यांनी अर्जाची छाणणी करावी वा अथवा समिती गठीत करुन छाणनी करुन घ्यावी.

**क)** निवड यादीचे प्रकाशन सप्टेंबर पर्यंत संचालक, विद्यार्थी विकास ह्यांनी करावे व तसे पात्र महाविद्यालयास कळवावे व तसेच पात्र महाविद्यालयांची यादी ही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करावी.

**८) यंत्र सामुग्री खरेदी -**

**अ)** ज्या महाविद्यालयांची निवड करण्यात आली असेल अशा महाविद्यालयांना ३०% राशी विद्यापीठ खाती जमा करावी लागेल.

**ब)** महाविद्यालयाने ३०% राशी जमा केल्यानंतर विद्यापीठाने त्यामध्ये ७०% राशी वळती करावी.

**क)** विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीनूसार यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येईल.

**ड)** सदर खरेदी केलेली उपकरणे ही विद्यापीठाच्या स्कंध पुस्तिकेत नोंद करुन नंतर निवड झालेल्या महाविद्यालयास हस्तांतरीत करावे.

**९) उपरोक्त नियमामध्ये किंवा निकषांमध्ये बदल करण्याचा अधिकार हा मा.कुलगुरूंचा असेल.**

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

************************

# संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना
## आवेदन पत्र

प्रति,
संचालक,
विद्यार्थी कल्याण,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजनेबाबत.**
**संदर्भ** : आपले पत्र क्र.संगाबाअवि-१३/५४/२०१७ दिनांक १८.०८.२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आमचे महाविद्यालय संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजनेकरीता पात्र असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे विहित प्रपत्रामध्ये नमूद करुन आपणाकडे पाठविण्यात येत आहे. कृपया या योजनेचा लाभ देण्यात यावा ही विनंती.

| **महाविद्यालयाने खालील माहीती भरावी व नको असेल ते खोडावे.** | | |
|---|---|---|
| **अ)** | महाविद्यालयाचे नाव | |
| **ब)** | संस्थेचे नाव | |
| **क)** | प्राचार्यांचे नाव | |
| **ड)** | महाविद्यालय १२ एफ व १२ बी आहे काय? असल्यास क्रमांक व दिनांक नमुद करावा. | |
| **इ)** | महाविद्यालयअतिदुर्गम/दुर्गम/आदीवासीबहुल/ मागास/ग्रामीण/शहरी विभागात स्थीत आहे काय. | होय/नाही (होय असल्यास पुरावा जोडावा) |
| **फ)** | महाविद्यालयातील मागील वर्षी ची पटसंख्या | |
| **ह)** | या याजनेचा लाभ घेण्यास्तव आपले महाविद्यालय पात्र आहे काय ? | होय /नाही |
| **टिप** | **तपशीलामध्ये प्रस्तावना भौगोलीक स्थिती, विद्यार्थी संख्या याप्रमाणे घ्यावा व Separate Seat जोडावी.** | |

प्राचार्यांची सही व शिक्का

**प्राचार्यांचे संमती पत्र**

मी. ------------------------------------------------------------------------------------------------
प्राचार्य,------------------------------------------------------------------------------------------------
आपणांस आश्वासीत करीतो की, विद्यापीठाने निर्देशीत केलेल्या नियमानुसार माझे महाविद्यालयास संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजनेचा लाभ घेण्यास माझी हरकत नाही.

प्राचार्यांची सही व शिक्का

**प्राचार्यांचे हमीपत्र**

मी, प्राचार्य ------------------------------------------------------------------------------------------------
महाविद्यालय आपणांस हमी प्रदान करतो की, विद्यापीठाने दिलेल्या यंत्रसामुग्रीचा मी उद्दिष्टानुसार वापर करेल. सदर यंत्रसामुग्रीची दुरूस्ती व देखभाल महाविद्यालय करेल व तसेच ज्या वेळी सदर सामुग्री अपलिखित करावयाची असल्या त्यावेळी मी तशी सुचना विद्यापीठास देईल व विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार व आदेशानुसार अपलिखित करण्याची मी हमी देतो.

प्राचार्यांची सही व शिक्का